An International, Registered & Referred Monthly Journal : **Social Work**
Research Link - 107, Vol - XI (12), February - 2013, Page No. 76-77
RNI No. MPHIN-2002-7041, ISSN No.-0973-1628

# ग्रामसभेतील लोकसहभाग : एक अभ्यास
## (संदर्भ - चोपडा तालुक्यातील पाच गावे)

*ग्रामसभेत सर्वच वयोगटातील सुशिक्षित व अशिक्षित अशा दोन्ही प्रकारचे पुरुष व स्त्रियादेखील उपस्थित राहतात. पुर्वी ग्रामसभेबद्दल लोक जागृती नव्हते. प्रत्येक गावात ग्रामसभा नियमित होते. प्रत्येक कुटूंबातील एकतरी व्यक्ती सभेला नियमित येते. काही गावांमध्ये सभेत वाद-विवाद होतो. सभेत प्रत्येक व्यक्तीला बोलण्याचा अधिकार असतो. काही गावांमध्ये महिलांची सभा होता नाही. प्रत्येक गांवामध्ये एक समाजकार्यकर्ता असावा असे लोकांचे मत आहे.*

**अनंत विनायक देशमुख एवं आशिष सुभाषलाल गुजराथी**

महात्मा गांधींनी भारतात खऱ्या लोकशाहीच्या स्थापनेची कल्पना केली होती. त्यांचे म्हणणे होते. खरे लोकशाही तंत्र केंद्रात बसलेल्या वीस लोकांद्वारे चालविले जात नाही. त्याला प्रत्येक गावाच्या लोकांनी चालवायचे असते. ग्राम स्वराज्यात गांव संपूर्ण सत्ता उपभोगणारा एक विकेंद्रीत राजकीय घटक असेल. या करिता प्रत्येक व्यक्तिचा सरकार अथवा शासनात सरळ सहभाग असेल.

ग्रामसभा ही लोकशाहीतील सर्वोच्च व्यवस्था असून ती सार्वभौम स्वयंभू आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ६ मध्ये ग्रामसभेची तरतुद केलेली आहे. ७३ व्या घटना दुरुस्त कायद्यातील कलम २४३ ग्रामसभेला संविधानिक अधिकार दिलेले आहेत. गावातील १८ वर्ष पुर्ण करणारा प्रत्येक मतदार ग्रामसभेचा आपोआप सभासद होतो. ग्रामसभेला निवडणूक नसते. परंतू विधानसभा व लोकसभेच्या सभासदांना निवडून देण्याच्या मताधिकार ग्रामसभेच्या सभासदांना असल्यामुळे ग्रामसभा ही विधानसभा व लोकसभेची जननी म्हणून ओळखली जाते. ग्रामपंचायतचे सर्व मतदार हे ग्रामसभेचे सभासद असतात.

ग्रामसभा ही ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सर्व मतदारांची सभा असते. ग्रामपंचायतीच्या सर्व प्रौढ मतदारांना ग्रामसभेला उपस्थित राहुन प्रश्न विचारण्याचा व ग्रामसभेच्या निर्णय प्रक्रियेमध्ये भाग घेण्याचा, सुचना करण्याचा, पुर्ण अधिकार असतो.

ग्रामसभेचे महत्व लक्षात घेवूनच कदाचित भारत सरकारने सन १९९९ - २००० हे वर्ष ग्रामसभेचे वर्ष म्हणून जाहिर केले. ग्रामिण जनतेचे भवितव्य हे ग्रामसभेच्या भविष्याशी जोडले गेलेले आहे. हे सर्व मान्य झालेले आहे. समृध्द खेडे समृध्द राष्ट्र भविष्य ग्रामिण जनतेचे भवितव्य ग्रामसभेचे अशा विविध घोषवाक्यांनी भारत सरकारचे ग्रामिण विकास खाते आपले औपचारिक कर्तव्य पार पडत आहे. याची कल्पना किती खेडूतांपर्यंत पोहचली असेल. हा संशोधकांसाठी मराठी संशोधनाचा विषय बनू शकतो. अशी पुसटशी कल्पना मनात येते. भारताचे माजी राष्ट्रपती मा. के. आर. नारायणन म्हणतात. आपल्या खेड्यातल्या जिवनावर अखेर राष्ट्रीय दर्जा निश्चित करण्यात येतो. ग्रामिण भागातले गरीब लोक महिला आणि कठावरल्यांना त्यांच्या जिवनावर अचुक आणि जबाबदाररित्या परिणाम करणाऱ्या ग्रामसभेच्या निर्णयामध्ये सहभागी होण्यासाठी संधी मिळते. तेव्हा ग्रामसभा आणि इतर पंचायतराज संस्थांना अधिकार आर्थिक मदत तसेच जबाबदाऱ्या देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर त्यांना शिक्षण दिले पाहिजे आणि त्यांच्या क्षमता वाढविल्या पाहिजेत.

राज्यात सन २००९ -१० हे वर्ष ग्रामसभा वर्ष म्हणून साजरे केले आहे. पुर्वीसारखी एखादी दुसरी ग्रामसभा घेवून आता ग्रामपंचायतींना थांबता येणार नाही. किंवा ग्रामसभा घेतल्याचे कागदोपत्री नाटक करुन चालणार नाही. या ग्रामसभा वर्ष कार्यक्रमानुसार वर्षात किमान सहा ग्रामसभा बंधनकारक आहेत. गावपातळीवरील ग्रामसभा बळकटीकरण, नागरीकांना ग्रामसभेद्वारे मिळणारे अधिकार व महत्व आणि त्यात मांडावयाच्या विषयांची माहिती कळविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

**विषय निवडीचे कारण :**

जिच्याजवळ कसदार व योग्य जमीन आहे. व तिच्यावर मुठभर शेतकरी व पुष्कळसे मजूर आहेत. अशा वस्तीला गांव म्हणतात. गांव म्हटले म्हणजे त्यात सरपंच, उपसरपंच, तलाठी, पोलीस पाटील, ग्रामसेवक इतर पुढारी व नागरीक यांचा समावेश होतो. या सर्वांच्या मदतीने गावाचा विकास करण्यात येतो. आणि त्यासाठी विविध उपक्रम घेण्यात येतात. त्यासाठी सर्वात महत्वाचे म्हणजे ग्रामसभा होय. या सभेत सर्व ग्रामस्थांचा समावेश होतो. व गावातील विविध घटकांवर किंवा समस्यांवर यात चर्चा करण्यात येते. तसेच गांवकऱ्यांचे कोटी प्रश्न असतील. ते ही यात सोडविण्यात येतात. पण या ग्रामसभेत गांवातील सर्वच लोक सहभागी होताता का? आणि ते आपले प्रश्न तेथे मांडतात का? ग्रामसभा कितपत यशस्वी होतात? त्यांना कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते? ग्रामसभा केंव्हा घेण्यात येते? ग्रामसभेचा उद्देश काय? ग्रामस्थांना ग्रामसभेत बोलण्याचा अधिकार असतो

*सहायक व्याख्याता, समाजकार्य महाविद्यालय, चोपडा ( महाराष्ट्र )*

का? ग्रामसभेत बोलण्यासंबंधी काही नियम असतात का? लोकजागृतीसाठी समाजकार्यकर्त्याची आवश्यकता आहे का?

या सर्व गोष्टींचा अभ्यास करुन घेण्यासाठी किंवा याबाबत माहिती जाणून घेण्यासाठी संशोधकाने हा विषय निवडलेला आहे.

**संशोधन विषयाचे उद्देश :**

(१) गांवातील ग्रामसभेतील लोकसहभागाबद्दल माहिती मिळविणे.

(२) ग्रामसभेबद्दल माहिती मिळवून लोकांकडून वापरावयाच्या जनजागृतीच्या पध्दतीची माहिती करुन घेणे.

(३) ग्रामसभेबद्दल जाणीव जागृती करण्यासाठी प्रशिक्षीत समाजकार्यकर्त्याची आवश्यकता अभ्यासणे.

**गृहितकृत्ये / उपकल्पना :**

संशोधकाने नव्याने निरीक्षण व वर्गीकरण केल्यानंतर जी वेगवेगळी स्वरुपात माहिती व तथ्ये उपलब्ध होतात. या सगळ्यांचा एकत्रित विचार करुन अभ्यासक किंवा संशोधक ज्या संभाव्य विधानांची मांडणी करतो. त्याला गृहितकृत्ये किंवा उपकल्पना असे म्हणतात. सदर संशोधनाचे गृहितके खालीलप्रमाणे आहेत.

(१) गावामध्ये नियमित ग्रामसभा होते म्हणून गावाचा विकास झपाट्याने होतो.

(२) ग्रामसभेत सर्व नागरीक येत नसल्याने ग्रामसभा नियमित होत नाही.

(३) ग्रामसभेत प्रत्येक नागरीकाचे प्रश्नांची/समस्यांची अंमलबजावणी होत नसल्याने त्यांचे प्रश्न सुटत नाही.

(४) ग्रामसभेत प्रत्येकाला बोलण्याचा अधिकार असल्यामुळे नागरीक ग्रामसभेत आपले प्रश्न व मत मांडतात.

(५) ग्रामसभेत मांडलेल्या विचारांबाबत सर्व नागरीकांचे सहमत असल्याने ग्रामविकास हा झपाट्याने होतो.

(६) ग्रामसभेत नेहमी वाद - विवाद होत असल्याने बहुतेक वेळा ग्रामसभा न घेता प्रौढ व्यक्तींची फक्त सही घेऊन ग्रामसभा झाल्याचे दाखविले जाते.

(७) ग्रामसभेमार्फत पारीत निर्णयाची अंमलबजावणीचा लाभ प्रत्येक नागरीकाला होतो.

(८) गावातील लोकांच्या समस्या गावातील लोकांचे व ग्रामपंचायत सदस्यांच्या मदतीने सोडवल्या जातात.

**नमुना निवड पध्दती :**

संशोधन कार्यासाठी तथ्य संकलन, ज्या ज्या व्यक्ती किंवा घटक उपयुक्त आहेत ते म्हणजे संशोधनाचे विश्व किंवा समग्र होय. आणि या समग्रातून काही एककांची तथ्य संकलनासाठी निवड करणे म्हणजे नमुना निवड करणे.

**साधा यादृच्छिक नमुना निवड :**

या पध्दतीत समग्रातील एककांची नमुन्यात निवड करणे हे संशोधकाच्या हातात नसते. ते पुर्णतः एककाच्या नशिबावर अवलंबून असते. यात प्रत्येक एककाला निवडीची समान संधी असते.

**नियमित अंकनप्रणाली :**

या पध्दतीत एककाची निवड आवश्यकतेनुसार होते. या पध्दतीत गावाची निवड करण्यासाठी प्रथम संशोधकाने चोपडा तालुक्यातील गांवे किती व कोणती हे माहिती केले. चोपडा तालुक्यातील एकूण ११२ आहेत. व त्यापैकी ९० गावांमध्ये ग्रामपंचायती आहेत. तेथे ग्रामसभा घेण्यात येतात. संशोधकाला या ९० गावांपैकी ५ गावांची निवड करावयाची होती. त्यासाठी नियमित अंकनप्रणालीचा वापर करण्यात आला.

त्यासाठी सर्वप्रथम २ ही संख्या गृहित धरली व नंतर १८ चा फरकाने समग्रातील प्रत्येक संख्येत १८ मिळवून जो नंबर आला त्या नंबरचे गांव निवडले.

१८ अ २ उ २०

२० अ १८ उ ३८

३८ अ १८ उ ५६

५६ अ १८ उ ७४

२, २०, ३८, ५६, ७४ नंबर ज्या गावाला दिले होते ती गावे संशोधन कार्यासाठी निवडण्यात आली ते नंबर व गांव पुढील प्रमाणे .

२ - अडावद २० - धानोरा ( प्र.अ )

३८ - कमळगांव ५६ - मंगरुळ

७४ - वर्डी

हि गावे संशोधन कार्यासाठी निवडण्यात आली व त्यानंतर संशोधक आपल्या संशोधन विषयाबाबत तथ्य संकलनासाठी गावातील सरपंच, पोलीसपाटील, तलाठी , ग्रामसेवक व गावातील दोन नागरीक यांच्याकडून संशोधकाने महिती मिळविली आहे.

**तथ्य संकलन :**

तथ्य म्हणजे अनुभव सिध्द सत्यापनीय अवलोकन होय.

तथ्य संकलनाच्या दोन पद्धती आहेत त्या पुढील प्रमाणे

(१) **प्राथमिक स्त्रोत :** मुलाखत अनुसूची, निरीक्षण, चर्चा

(२) **द्वितीय स्त्रोत :** कागदपत्रे, मासिके, पुस्तके, वृत्तपत्र, अहवाल

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोत तसेच द्वितीय स्त्रोत या दोघांचा वापर करण्यात आला आहे.

**ठळक निष्कर्ष :**

(१) ग्रामसभेत सर्वच वयोगटातील सुशिक्षित व अशिक्षित अशा दोन्ही प्रकारचे पुरुष व स्त्रियादेखील उपस्थित राहतात. (२) पुर्वी ग्रामसभेबद्दल लोक जागृती नव्हते. (३) प्रत्येक गावात ग्रामसभा नियमित होते. (४) प्रत्येक कुटूंबातील एकतरी व्यक्ती सभेला नियमित येते. (५) काही गावांमध्ये सभेत वाद - विवाद होतो. (६) सभेत प्रत्येक व्यक्तीला बोलण्याचा अधिकार असतो. (७) काही गावांमध्ये महिलांची सभा होत नाही. (८) प्रत्येक गावांमध्ये एक समाजकार्यकर्ता असावा असे लोकांचे मत आहे.

**सूचना :**

(१) ज्या गावात महिलांची सभा होत नाही तेथील ग्रामपंचायत महिला सदस्यांनी गावात महिलांची सभा घ्यावी. (२) महिलांच्या प्रश्नांनाही सभेत प्राधान्य देण्यात यावे. (३) ज्या गावात सभेत वाद - विवाद होत असतील तेथे वाद - विवाद होऊ नये म्हणून सतर्कता बाळगांवी. (४) गावात ग्रामसभेच्या मदतीने कार्यक्रम घेण्यात यावे.

***संदर्भ :***

*(१) डॉ. खापर्डे सुदर्शन डी. : ग्रामपंचायत प्रशासन विद्या प्रकाशन, रुईकर रोड महाल, नागपूर, मे २००८. (२) डॉ. पाटील व. भा.: पंचायत राज, विद्या प्रकाशन,रुईकर रोड महाल, नागपूर, १९९९. (३) डॉ. देवगांवकर श. गो. : पंचायत राज आणि सामुहिक विकास, साईनाथ प्रकाशन, १, भगवाघर कॉम्प्लेक्स, धरमपेठ, नागपूर१० मार्च - २००७. (४) श्रीकृष्ण नेवसे : सकाळ वृत्तसेवा दि. १० जानेवारी २०१०, गावाचे अधिकार कळण्यासाठी यंदा 'ग्रामसभा वर्ष'.*